# पुणे विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना

**डॉ. पंडीत एन्. शेळके**
एम्.एस्सी.,पीएच् डी.
**प्र. कार्यक्रम समन्वयक**

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.

कार्यालय क्र. : ०२०-२५६९७३४१
०२०-२५६०११५३
०२०-२५६०११६०
फॅक्स क्र. : ०२०-२५६९७३४१


रासेयो/ ९५५ /२०१३

दि. २६/११/२०१३

**प्रति,**
**मा. प्राचार्य/कार्यक्रम अधिकारी**
**पुणे, अ.नगर, नाशिक जिल्हा**
**रासेयो संलग्नीत महाविद्यालये**

**विषय :** जागतिक एड्स दिन १ डिसेंबर निमीत्त एड्स जनजागृती सप्ताह साजरा करणे बाबत...

मा. महोदय,

पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, पुणे जिल्हाधिकारी कार्यालय व पुणे शहर एड्स नियंत्रण सोसायटी, यांच्या संयुक्त विद्यामाने पुणे विद्यापीठातील सर्व महाविद्यालयातून दि. १ ते ७ डिसेंबर २०१३ दरम्यान एड्स जनजागृती सप्ताह साजरा करण्यात यावा. विद्यार्थ्यांसाठी रेड रिबन क्लबद्वारा रॅली, निबंध स्पर्धा, पोस्टर्स स्पर्धा, भाषण स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, गटचर्चा, इ. जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन आपल्या महाविद्यालात एन.एस.एस. स्वयंसेवकाच्या सहभागातून करावयाचे आहे.

जागतिक एड्स दिन २०१३ या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र राज्य एड्स नियत्रंण सोसायटी, मुंबई, महाराष्ट्र शासन यांचे घोषवाक्य शुन्य गाठायचा आहे. "Getting to Zero" म्हणजेच

**१. यापुढे नवीन एच.आय.व्ही. संसर्ग हाऊ द्यायचा नाही.**

**२. कलंक भेदभाव शून्यावर आणणे.**

**३. एड्सने होणाऱ्या मृत्युंचे प्रमाण शून्यावर आणणे.**

पुणे जिल्हाधिकारी कार्यालय व पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक एड्स दिन. दि. १/१२/२०१३ रोजी महाविद्यालयीन विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था, यांच्या वतीने एड्स जनजागृती रॅली आयोजित करण्यात येत आहे. सदर रॅली. स. ८.१५ वा. शनिवार वाडा येथून निघणार आहे.

**पुणे शहरातील रासेयो संलग्नीत महाविद्यालयांनी प्रत्येकी ५० विद्यार्थी-विद्यार्थीनी कार्यक्रम अधिकारी समवेत सहभागी करावेत.** सदर कार्यक्रमाचा अहवाल रासेयो कार्यालयात जमा करावा. हि विनंती,

कळावे,

आपला विश्वासू

२६/११/१३

प्र. कार्यक्रम समन्वयक
राष्ट्रीय सेवा योजना

Pc2/Tin Job/Daily Lette213

**Website :** http://www.unipune.ac.in/nss **e-mail :** nss@unipune.ac.in